जा.क्र./OW.No.1316/पोउआ/प्रकटीकरण /2021
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.
दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220
दिनांक/Date : 01 /11/2021

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :– Best Detection of the Month September – 2021 ‘उत्कृष्ट गुन्हे शोध’ व Best Conviction of the Month September – 2021 ‘उत्कृष्ट अपराधसिध्दी’ पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन/बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे सप्टेंबर–२०२१ करीता “ **बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिध्दी)** ” याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे सप्टेंबर – २०२१ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –**

**साकीनाका पोलीस ठाणे, परिमंडळ – १०,** गु.र.क्र. ९३७/२०२१, कलम ३०२, ३०७,३७६,३२३,५०४,३४ भा.दं.वि. सह कलम ३(१)(), ३(२)(ट) अॅट्रासिटी अॅक्ट १९८९

ब) **माहे सप्टेंबर – २०२१ करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –**

**शाहूनगर पोलीस ठाणे, परिमंडळ – ०५,** गु.र.क्र. ३८९/२०१५ कलम ३७६ (२)(प),५०६(२) भादवि सह कलम ४, ६, ८, १२ पोक्सो अधिनियम,

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

सही/–
पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

मजकुर :—

दिनांक २८/१०/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **Best Detection of the Month** माहे सप्टेंबर—२०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर—२०२१

| | | |
|---|---|---|
| 01 | साकीनाका पोलीस ठाणे, परिमंडळ—१० | गु.र.क्र.९३७/२१, भादवि कलम ३०२, ३०७, ३७६, ३२३, ५०४, ३४ भादवि, कलम ३(१)(),३(२)(अ) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ |

—: '' खुन '':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री. अरविंद भानुसिंग यादव, वय २१ वर्षे, हे सिक्युरीटी गार्ड म्हणून नोकरीस आहेत. दिनांक १०/९/२१ रोजी ०३:०० वा. चे सुमारास फिर्यादी सन्मान बार समोर, साकीनाका, येथे टेम्पोत बसलेले असताना अचानक टेम्पोला धक्का लागल्याची त्यांना जाणीव झाली. त्यावेळी फिर्यादी यांनी समोर पाहीले असता समोरील टेम्पोमध्ये एका महिलेस मारहाण होत असल्याचे त्यांना दिसले. सदरवेळी फिर्यादी यांनी पोलीस मदत मिळण्यासाठी पोलीस नियंत्रण कक्षाला १०० नंबरवर संपर्क केला. सदर ठिकाणी तात्काळ पोलीस पथक पोहचले व त्यांनी बळीत महिला ही गंभीर जखमी असल्याने तीस उपचाराकरीता तात्काळ राजावाडी रूग्णालय येथे दाखल केले. व पोलीस ठाणेस गुन्हा नोंद करण्यात आला.

नमुद बळीत कविता पोपट शिंदे, वय ३२ वर्षे हीच्यावर राजावडी रूग्णालय येथे उपचार चालु असताना दिनांक ११/०९/२०२१ रोजी उपचारादरम्यान तीचा मृत्यु झाल्याने तसेच बळीत महिला ही अनुसुचित जातीची असल्याने नमुद गुन्हयाच्या कलमामध्ये कलम ३०२ भा.द.वि.सह कलम ३(१)(),३(२)(अ) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ या कलमांची वाढ करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. अरविंद भानुसिंग यादव, वय २१ वर्षे |
| बळीत | :— | कविता पोपट शिंदे, वय ३२ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | मोहन कथवारू चौहान, वय ४५ वर्षे,<br>दिनांक १०/०९/२०२१ रोजी |

तपास कौशल्य :— नमूद गुन्हयाचे गांभीर्य व तिव्रता लक्षात घेता वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीचा शोध घेण्यासाठी पथके तयार करण्यात आली. त्यामध्ये पोउनि उमेश दगडे यांचे पथकाने गुन्हयाच्या घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज मध्ये बळीत महिला हीला एक व्यक्ती मारहाण करीत असल्याचे दिसून आले. परंतु नमूद सीसीटीव्ही फुटेज मध्ये मारहाण करणाऱ्या व्यक्तीचा स्पष्ट चेहरा दिसून येत नव्हाता. सदरचा इसम हा नमूद गुन्हयातील पाहीजे आरोपी असल्याचे निश्चित झाल्यानंतर त्याचा शोध घेण्याच्या दृष्टीने पथकाने ज्या रस्त्यावरून पाहीजे आरोपी हा आलेला होता त्या रस्त्यावरील विविध सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे सीसीटीव्ही फुटेज यांची तपासणी केली.

तपासा दरम्यान एका सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये पाहीजे आरोपीचा चेहरा स्पष्टपणे दिसून आला. नमूद सीसीटीव्ही फुटेजमध्ये पाहीजे आरोपीचा मिळून आलेल्या फोटो हा गुन्हा घडलेल्या परिसरामधील लोकांना दाखविण्यात आला. त्यापैकी काही लोकांनी सदरचा इसम हा खैराणी रोड परिसरामध्ये फिरत असून पार्कींग केलेल्या वाहनांमध्ये रात्रीच्या वेळी झोपतो तसेच बदली ड्रायव्हर म्हणून काम करतो अशी माहिती मिळाली. नमूद माहितीच्या आधारे खैराणी रोड येथे ज्या ज्या ठिकाणी वाहनतळ आहे त्या ठिकाणी जावून पाहीजे आरोपी याचा शोध घेतला. परंतु सदरचा आरोपीचा शोध लागत नव्हता.

त्याकरीता नमूद विभागामधील गुप्त माहितीदार यांना पाहीजे आरोपी बाबत अवगत करून त्याचा शोध घेण्यास त्यांना विनंती करण्यात आली. एका गुप्त माहितीदाराकडून पाहीजे आरोपी हा बाहेरगावी पळून जात असल्याची माहिती प्राप्त झाली. प्राप्त माहितीच्या आधारे पथकाने जंगलेश्वर मंदिर रोड, येथे सापळा रचून आरोपी हा रिक्षातून पळून जाताना त्यास पकडले.

त्याच्याकडे नमूद गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता त्याने त्याचे नांव मोहन कथवारू चौहान वय ४५ वर्षे, असे सांगीतले. नमूद गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे निश्चित झाल्यानंतर त्यास दिनांक १०/०९/२०२१ रोजी १७.२० वा. अटक करण्यात आली. नमूद गुन्हयामध्ये अटक आरोपी नामे मोहन कथवारू चौहान वय ४५ वर्षे याने नमूद गुन्हयातील बळीत महिलेचा जीव घेण्याचे उद्देशाने मयत महिलेच्या गुप्तांगात हत्यार घुसवुन तिला जीवे ठार मारले. अटक आरोपीने याने महिलेशी केलेले कृत्य हे अमानवीय व निंदनीय होते. अटक आरोपी याचे या कृत्यामुळे

समाजामधील महिलांमध्ये मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झालेला होता. अशा परिस्थीतीमध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक कौशल्य व जनमानसामध्ये असलेला संपर्क याचा पुरेपूर वापर करून नमूद संवेदनशिल गुन्हयामधील पाहीजे आरोपी यांस गुन्हा घडल्यापासून १४ तासाच्या आंतमध्ये अटक केलेली आहे.

**साकीनाका पोलीस ठाणे तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहाय्यक पोलीस आयुक्त | श्रीमती. ज्योत्स्ना रासम | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. बळवंत देशमुख | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री. दत्तात्रय ढुमे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.उप.नि. | उमेश दगडे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र.९८०६८२ | भगवान टोपल | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ना.क्र.०६१६६० | प्रकाश पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.शि.क्र.०९१४४ | रमेश आहेर | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक २८/१०/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या ‘‘ BEST CONVICTION OF THE MONTH " माहे सप्टेंबर २०२१ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर— २०२१

| | | |
|---|---|---|
| ०१ | शशाहूनगर पोलीस ठाणे, परिमंडळ—०५ | गुरक्र. ३८९/१५ कलम ३७६ (२) (ए), ५०६ (ष),भादवि सह कलम ४, ६, ८, १२ पोक्सो अधिनियम, २०१२ |

—: ‘‘ अल्पवयीन मुलीवर लैगीक अत्याचार.’’:—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात दिनांक ०७/१२/२०२१५ रोजी फिर्यादी यांची पुतणी पल्लवी हिने त्यांना असे सांगीतले की, दि. २५/११/२०१५ रोजी ते दादर टर्मिनल येथे आईला सोडवायला गेला असता शेजारचे राणे काका आपल्या घरी आले व त्यांनी घराच्या आतली कडी लावली. त्यावेळी मी व संजीवनी टि.व्ही. पाहत असतांना राणे काकांनी संजीवनीला जवळ बोलावुन तिच्या चड्डीत हात घालुन काहीतरी करत होते. त्यावेळी मी व संजीवनी ओरडल्याने ते तिथुन पळुन गेले अशी माहिती समजल्यावर फिर्यादी यांनी संजीवनीला विचारले असता तिने ‘‘ राणे काकानी माझ्या चड्डीत हात घालुन खाली ओढली व त्यांचे लघवीची जागा बाहेर काढुन माझे लघवीची जागेत घातले त्यावेळी मी जोरात ओरडल्याने त्याने मला सोडुन दिले’’ व तेथुन निघुन जाताना कोणाला काही सांगितल्यास जिवे मारून टाकण्याची धमकी दिली असे सांगितले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | दिपक पांडूरंग घेवदे, हि वय ४२/वर्ष |
| बळीत | :— | कु. संजीवनी आंनद घेवदे वय १० वर्ष |
| निकाल दिनांक | :— | दि.३०/०९/२०२१ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | | दिपक नारायण राणे हि/५४ वर्षे<br>अटक दिनांक ०७/१२/२०१५ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | १) कलम ३७६ (२) (ए),भादवि या करीता २० वर्ष सजा तसेच रुपये १०,०००/— च्या दंडाची शिक्षा व दंड न भरल्यास दोन महीन्याचा करावास<br>२) कलम ५०६(ष) प्रमाणे २ वर्ष सजा तसेच रुपये ५००० च्या दंडाची शिक्षा. दंड न भरल्यास एक महीन्याचा अधिक करावास. |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी गुन्हयाचा योग्य रित्या तपास करून आरोपीता विरुध्द सबळ पुरावे प्राप्त केले. तसेच आरोपीतास शिक्षा लागण्याकरीता चाकोरीबध्द कामकाज केले. साक्षीदार व पंच यांना मा. न्यायालयाच्या सुनावणी तारखेस वेळोवेळी हजर केल्याने आरोपीविरूध्द दोषसिध्द होवून आरोपीस नमुद प्रमाणे शिक्षा झालेली.

### शाहूनगर पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री. दिपक पालव | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | श्री. दिलीप गुजर | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | श्री. सचिन शिर्के | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.उप.नि. | अविनाश शेळके | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.ह.क्र. २९७३२ | महेश बागवे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ना.क्र. ०४०३७५ | ज्ञानेश्वर सोनावणे | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | म.पो.शि.क्र. ०९२६८८ | किरण आराख | प्रशस्तीपत्रक |

टिप:— वरिष्ठ पोलीस निरीक्षक, साकीनाका मुंबई व शाहूनगर पोलीस ठाणे यांना कळविण्यात येते की, Best Detection of the Month September – 2021 व Best Conviction of the September -- 2021 या करीता निवड झालेनंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of Month) करीता प्रत्येक

महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे

# Best Detection of the Month

## 'प्रपत्र 'क'

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) थ्व्त  प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी त्मबवतकए दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत,  Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे  त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>।) साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>ठ)पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>ब) परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>क) तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>म) वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>थ) तपासी अंमलदार यांचे जबाब<br>ळ) पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>भ) सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# <u>INTEGRITY CERTIFICATE</u>

Certified that the integrity of Mr/Mrs …………………………………, Designation-…………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2021 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2021